# जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

(महसुल शाखा)

फोन नंबर-:0253-2319006 Email ID estnashik@gmail.com

**वाचले:-**

1) केंद्र शासनाकडील पर्यावरण व वनमंत्रालयाकडील सारसंग्रहीत आदेश क्र.2-36-86 एफसी-दि- 31/07/1986.
2) शासन महसुल व वनविभाग परिपत्रक क्र.एलएनडी-1071/18/3736-अ/दोन दिनांक 09/09/71.
3) महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:उगोप्र सुप्रमा 1212/प्र.क्र.793/11/ मोप्र-1 दिनांक-10 नोव्हेंबर, 2017
4) कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.-लपाविना/अस्था/3750/सन-2018 दिनांक-10/09/2018.
5) या कार्यालयाचे पत्र क्रं.मशा/कक्ष/3/6/कावि-687/2018 दिनांक-18/09/2018 व अंतिम पत्र क्रं.मशा/कक्ष/3/6/कावि-500/2019 दिनांक- 25/06/2019.
6) उपवनसंरक्षक पश्चिम भाग, नाशिक यांचेकडील कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांना दिलेले पत्र जा.क्र.कक्ष-3/जमीन/1482/सन 2018-19 दिनांक-18/07/2019
7) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडील उपवनसंरक्षक पश्चिम भाग, नाशिक यांना दिलेले पत्र जा.क्र.-लपाविना/आ-6/3702/सन 2019 दिनांक-01/08/2019.
8) उपवनसंरक्षक पश्चिम भाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.कक्ष-3/जमीन/वसं/ 3653/सन 2019-20 दिनांक-02/12/2019.
9) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22

COLLECTOR OF NASHIK

क्र.मशा/कक्ष/3/6/कावि- 111 /2020
नाशिक दिनांक:- /01/2020. 17/02/2020

**आदेश**

केंद्र शासनाकडील पर्यावरण व वन मंत्रालयाकडील पर्यावरण, वने व वन्य जीवन विभागाच्या दि.31/7/1986 च्या आदेश क्र.2-3-86 एफसी या क्रमांकाच्या संदर्भानुसार निर्गमित केलेल्या सारसंग्रहीत निर्णयाच्या परिच्छेद 8 (2) नुसार वन जमीनीचा उपयोग वनेतर कामासाठी करावयाचा असल्यास तितकीच वनेतर जमीन उपलब्ध करून देण्याची तरतुद असुन उपलब्ध वनेतर जमीनीवर पर्यायी वनीकरणाची योजना राबवावयाची आहे अशा वन जमीनीच्या बदल्यात वनेतर जमीन उपलब्ध केल्यावरच वन जमीन वापरण्यास परवानगी देण्याची तरतुद आहे.

नाशिक जिल्हयातील खालील कामासाठी वन जमीन घेण्यात येणार आहे व त्यासाठी वनेतर जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता,लघु पाटबंधारे विभाग,नाशिक यांचेकडील पत्र दिनांक-10/09/2018 अन्वये इकडेस प्राप्त झालेला आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव/ प्रकल्पाचे नांव | प्रकल्पासाठी संपादीत होणारी वनजमीन | | |
|---|---|---|---|---|
| | | गांवाचे नांव व तालुका | गट नंबर | क्षेत्र हे.आर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | वळण योजना ननाशी ता. दिंडोरी जि.नाशिक | मौजे ननाशी ता. दिंडोरी जि. नाशिक | 141 फॉरेस्ट | 1.25 |
| | | | 193 फॉरेस्ट | 2.23 |
| | | | **एकूण** | **3.48** |

उपरोक्त प्रमाणे वळण योजना ननाशी ता.दिंडोरी जि.नाशिक या योजनेसाठी लागणाऱ्या 3.48 हे.आर वन जमिनीचे बदल्यात वन विभागास पर्यायी वनेतर जमीन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने, नाशिक जिल्हयातील महाराष्ट्र शासन/सरकारी म्हणुन 7/12 सदरी नोंद असलेली जमीन ही वनजमीन म्हणुन सोईस्कर व सदर जमीनीस वनजमिनीचा दर्जा प्राप्त होऊ शकेल किंवा कसे? याबाबत उपवनसंरक्षक पश्चिम भाग, नाशिक यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते. त्यानुसार उपवनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांनी त्यांचे वाचले क्र. 8 वर नमुद पत्रान्वये मौजे होलदारनगर ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथील गट नं.13 मधील क्षेत्र 31.97 हे.आर ही जमीन पर्यायी वनेतर जमीन म्हणुन वनविभागास हस्तांतरीत करण्याबाबत ग्रामपंचायत होलदारनगर ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक यांनी ग्रामसभेच्या ठरावासह मंजुरी दिलेली आहे व सदर अहवालास वनपरिक्षेत्र अधिकारी नाशिक यांची संमती असलेबाबत अभिप्राय इकडेस सादर केलेले आहेत.

(पुढील पानांवर)

त्यानुषंगाने मौजे होलदारनगर ता.त्र्यंबकेश्वर जि. नाशिक येथील गट नं.13 चे एकूण क्षेत्र 31.97 आर पैकी लघु पाटबंधारे तलाव बोरीपाडा,ता.त्रिंबक जि.नाशिक या योजनेसाठी 9.19 हेक्टर आर व मौजे मुळेगांव अंजनेरीगड रस्त्यासाठी 18.00 हे.आर अशी एकूण (9.19+18.00=27.19) क्षेत्र 27.19 हे आर जमिन या कार्यालयाचे दिनांक-21/01/2020 रोजीचे आदेशानुसार वन विभागाकडे वर्ग केलेले आहे. उर्वरीत क्षेत्र (31.97-27.19=4.78) क्षेत्र 4.78 हे.आर पैकी ननाशी वळण योजनेसाठी 3.48 हे आर क्षेत्र वनेत्तर जमीन म्हणून वनविभागाकडे वर्ग करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव/ प्रकल्पाचे नांव | योजनेसाठी पर्यायी वळतीकरण होणारी वनेतर जमीन | | |
|---|---|---|---|---|
| | | गांवाचे नांव /तालुका | गट नंबर/क्षेत्र | वनविभागाकडे वर्ग करावयाचे क्षेत्र हे.आर |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | वळण योजना ननाशी ता.दिंडोरी जि.नाशिक. | मौजे होलदारनगर ता. त्र्यंबकेश्वर जि.नाशिक | गट क्रं.13 एकूण क्षेत्र 31.97 हे.आर | 3.48 |
| | | | **एकूण** | **पै.3.48** |

महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः उगोप्र सुप्रमा 1212/प्र.क्र.793/11/मोप्र-1 दि-10/11/2017 रोजी उर्ध्व गोदावरी प्रकल्प, जि.नाशिक या प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास रूपये 917.74 कोटी इतक्या किंमतीस मान्यता प्रदान झालेली आहे.

सबब शासन महसूल व वनविभागाकडील परिपत्रक दिनांक 9 सप्टेंबर 1971 अन्वये प्राप्त अधिकार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22 चे तरतुदीनुसार मी जिल्हाधिकारी नाशिक या आदेशान्वये मौजे होलदारनगर ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक येथील वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे गट नं.13 चे एकुण क्षेत्र 31.97 हे.आर पैकी 3.48 हे.आर जमीन वळण योजना ननाशी ता.दिंडोरी जि.नाशिक येथील लिंक कट कालव्यासाठी लागणाऱ्या वनजमीनीचे बदल्यात पर्यायी वनेतर जमीन म्हणुन वन विभागाकडे वर्ग करण्यास मंजुरी देत आहे. आवश्यक त्या नोंदी अभिलेखात घेण्यात याव्यात.

COLLECTOR OF NASHIK

**(सूरज दि.मांढरे)**
**जिल्हाधिकारी नाशिक**

प्रति

1) कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग नाशिक.
2/-पर्यायी म्हणुन दिलेल्या जमीनीची मोजणी करणेबाबत आपले स्तरावरून कार्यवाही करावी.

प्रत:-1) उप वनसंरक्षक, पश्चिम भाग, नाशिक यांचेकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
2) जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख नाशिक यांना उचित कार्यवाहीसाठी रवाना.
3) उपविभागीय अधिकारी इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
4) तहसिलदार दिंडोरी यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
5) तहसिलदार त्र्यंबकेश्वर यांचेकडेस माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/-वरीलप्रमाणे वर्ग केलेल्या जमीनीचा ताबा वन विभागास दयावा. तसेच दुरूस्त 7/12 उतारा व 6 ड नोंदीसह अहवाल इकडेस सादर करावा.

स्वाक्षरित-x-x-x-
**जिल्हाधिकारी नाशिक करिता**